# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date: 14 April 2024

# Time: 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १४ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३३ वी जयंती;सर्वत्र अभिवादनपर कार्यक्रमांचं आयोजन
- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात प्रचाराचे शेवटचे काही दिवस शिल्लक;प्रचाराला वेग

  आणि
- गारपिटीसह अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानापोटी तातडीने मदत करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

****

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती आज साजरी होत आहे. या निमित्तानं सर्वत्र विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आंबेडकर जयंतीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. बाबासाहेबांनी घालून दिलेल्या आदर्शांचं अनुसरण करावं, आणि देशाच्या सर्वसमावेशक विकासासाठी सामुहिकरित्या कार्य करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात काल `आंबेडकर यांचे मूलगामी विचार` या विषयावरील परिसंवादात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. ऋषीकेश कांबळे, लोकप्रशासन विभाग प्रमुख सतीश दांडगे, विधी अधिकारी डॉ. आनंद देशमूख यांनी आपले विचार मांडले. `राष्ट्रनिर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर` या विषयावर आज डॉ अरविंद गायकवाड आपले विचार मांडणार आहेत. विद्यापीठाच्या नाट्यगृहात सकाळी साडे अकरा वाजता हा कार्यक्रम होणार आहे

छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि प्रबळ लोकशाही करता मतदानाचं महत्त्व' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळे यांचं व्याख्यान होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात सकाळी ११ वाजता हे व्याख्यान होईल.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं भडकल दरवाजा परिसरात असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली आहे. या पुतळ्यासह शहर आणि परिसरातील विविध ठिकाणच्या स्मारकांवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानतर्फे हा उपक्रम घेतला जाणार आहे. दरम्यान काल रात्री अनेक ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीनं बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त नागरिकांना वहीपेन दान करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे, नागरिकांचा या योजनेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

****

बीड जिल्ह्यात गेवराई इथं डॉ आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या भीमज्योती महोत्सवात, र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर वीस हजार वह्यांच्या माध्यमातून बाबासाहेबांची प्रतिमा साकारण्यात आली. या वीस हजार वह्या गरजू विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा देतील, असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यावेळी व्यक्त केला.

****

धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांतर्गत शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या दोनशे विद्यार्थ्यांनी काल सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग बारा तास अभ्यास करून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केलं.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातल्या कवडा इथल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयात विद्यार्थ्यांनी भव्य रांगोळी रेखाटून मतदार जनजागृती केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं स्वप्न साकार करू, चला मतदान करू. प्रिय, आई बाबा माझे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी आपण मतदान कराच, आदी संदेश या रांगोळीच्या माध्यमातून देण्यात आले.

****

नांदेड जिल्हा पोलीस दल आणि राम मनोहर लोहिया प्रतिष्ठान विकास मंडळ यांच्या वतीने बाबासाहेबांच्या जयंती सोहळ्यानिमित्त एक आराखडा निश्चित करण्यात आला आहे. जयंती मिरवणुकीवेळी डीजे बंद करू, गरजू होतकरू विद्यार्थ्यांना कपडे आणि वही पेन वाटप करू, व्यसनमुक्तीचा संकल्प घेऊ, शिक्षणाची ओढ निर्माण करू, आदी संदेश कलापथकाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यात सर्वत्र दिला जाणार आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे या टप्प्यात मतदान असलेल्या मतदार संघांमध्ये प्रचारसभांना वेग आला आहे. प्रमुख राष्ट्रीय पक्षांच्या नेत्यांच्या सर्वत्र प्रचारसभा सुरू आहेत. भंडारा-गोंदिया मतदार संघात महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारार्थ आज भाजप नेते अमित शहा यांची सभा होणार आहे. याच मतदार संघात महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत पडोळे यांच्या प्रचारासाठी काल काँग्रेस नेते राहूल गांधी यांची सभा झाली. दरम्यान, काँग्रेस पक्षाने १६ उमेदवारांची आणखी एक यादी काल जाहीर केली.

वाशिम-यवतमाळ लोकसभा मतदार संघाच्या महायुतीच्या शिवसेनेच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारार्थ प्रसिद्ध अभिनेते तथा शिवसेना नेते गोविंदा आहुजा यांनी वाशीम इथं प्रचार फेरी काढली.

गडचिरोली-चिमूर मतदार संघात महायुतीचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ चंद्रपूर भिसी इथं, भाजपा विजय संकल्प सभेत भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केलं.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या, भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्याकडे राज्यासाठी काही मागण्या आहेत. यात मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यापासून ते राज्यातील गड किल्ल्यांचं संवर्धन करणं, रोजगारनिर्मिती आणि सर्व राज्यांना एकसमान वागणूक मिळायला हवी, आदी मागण्यांचा समावेश असल्याचं, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नमूद केलं. त्यांनी काल मुंबई इथं प्रसारमाध्यमांशी संवाद

साधला. लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेण्यासंदर्भातला निर्णय चर्चेअंती घेण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

हिंगोली लोकसभेचे महायुतीचे शिवसेना पक्षाचे उमेदवार बाबुराव कदम यांचं हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथलं प्रचार कार्यालय विनापरवाना उभारल्याचं आढळल्याने निवडणूक विभागाने त्यावर कारवाई केली. याबाबत वंचित बहूजनचे राजू कांबळे यांनी तक्रार केली होती. या कार्यालयातलं सर्व प्रचार साहित्य हटवण्यात आलं असून, आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्यासाठी जोमाने प्रचार करणार असल्याचं विद्यमान खासदार भावना गवळी यांनी सांगितलं आहे. त्या काल वाशिम इथं पत्रकार परिषदेत बोलत होत्या. आपल्याला उमेदवारी मिळाली नाही, याची खंत नक्कीच वाटली, मात्र राजश्री पाटील यांना निवडून आणण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रचारात उतरणार असल्याचं, खासदसर गवळी यांनी स्पष्ट केलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रत्नागिरी-सिंधुदूर्ग लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

****

विदर्भ आणि मराठवाड्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याचे निर्देश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. निवडणूक आचारसंहितेचा विचार करता आयोगाला विनंती करून अधिकारी स्तरावर बैठक घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. हिंगोली जिल्ह्यातल्या हदगाव इथं शिंदे बोलत होते. नुकसानाचे पंचनामे तातडीने करण्याचे निर्देश दिल्याचं शिंदे म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातल्या जटाळेवाडी इथ विज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या

कुटुंबीयांना शासनाकडून पाच लाखांची मदत देण्याची घोषणा, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

****

जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत वादळी वारा आणि अवकाळी पावसामुळे आठशे ७४ शेतकऱ्यांच्या सुमारे चारशे चार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. लहान मोठी ३९ जनावरं आणि २५० कोंबड्यां दगावल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली.

****

दरम्यान, धाराशिव तालुक्यातल्या वाघोली शिवारात काल दुपारी गारपिटीसह पाऊस झाला.

राज्यात येत्या दोन दिवसात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****

भारतीय सैन्य दलाचे सैनिक गजानन नवल यांचं परवा जालना इथं अपघाती निधन झालं, त्यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानातल्या प्राणी संग्रहालयातल्या समृद्धी वाघिणीचा काल मृत्यू झाला. गेल्या १५ दिवसांपासून तिच्यावर उपचार सुरू होते. याच प्राणी संग्रहालयात १५ वर्षांपूर्वी जन्मलेल्या समृद्धी वाघिणीने एकूण १० छाव्यांना जन्म दिला. यापैकी एक वाघ पुण्यात तर दोन वाघ अहमदाबाद इथल्या प्राणी संग्रहालयात दिलेले असून, उर्वरित सात वाघ छत्रपती संभाजीनगर इथल्याच प्राणी संग्रहालयात आहेत.

****

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या नेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल दानवे यांच्यासह पक्षाच्या इतर सदस्यांचीही विविध पदांवर नियुक्ती केली.

****

मतदानाप्रति कर्तव्य भावना जागरुक व्हायला हवी, लोकशाही बळकट करायची असेल तर मतदानाचं प्रमाण वाढण्याची गरज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केली आहे. काल वैजापूर इथं स्वीप उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

****

परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड इथही मतदान जनजागृती कार्यक्रमानिमित्त मतदानाचे महत्व पटवून देण्यासाठी शहरात सायकल फेरी काढण्यात आली.

****

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी काल लोकसभा निवडणूक खर्च विषयक विविध समिती आणि पथकांचा आढावा घेतला. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी उमेदवारांकडून प्रलोभनं दाखवली जाणार नाहीत, याबाबत सर्वांनी सतर्क राहावं, असा सूचना बॅनर्जी यांनी दिल्या.

****